“लोकमत व सकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित राजकीय बातम्यांचा तौलनिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आंतर विद्याभ्यास या विद्याशाखे अंतर्गत मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम या विषयासाठी पीएच.डी.(Ph.D) पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन आराखडा (प्रस्तावित आराखडा)

संशोधक
सतिश प्रकाश वागरे
एम.ए., सेट (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.बालाजी शिंदे
वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगांव
ता.गंगाखेड जि.परभणी

संशोधन केंद्र
स्कुल ऑफ मिडीया सायन्स
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै - २०१९

"लोकमत व सकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित राजकीय बातम्यांचा तौलनिक अभ्यास"

प्रस्तावना :

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून वृत्तपत्रास म्हणाले जाते. माहिती मनोरंजन, ज्ञान, संस्कृती, विज्ञान, राजनितीचे प्रभावी साधनआहे. वृत्तपत्राचा मुख्य उद्देश हा समाज सुधारणे करता आहे. लोकांच्या गरजा इच्छा आकांशा हित जोपासुन लोकांच्या न्याय हक्कांच्या रक्षणासाठी वृत्तपत्र हे लढवच्या सैनिका सारखे सदैव पुढे असते.

स्वातंत्र काळात भारतीय अस्मितेचे प्रतीक असणाऱ्या स्वातंत्र्य लढ्यात वृत्तपत्राच्या माध्यमातून राष्ट्रीय नेत्यांनी जन आंदोलने उभे केले.

स्वातंत्र्योत्तर काळात वृत्तपत्रे लोकांचा आवाज होऊन इंग्रजांच्या अतयाचाराच्या विरोधात उभी राहिली. वृत्तपत्र सर्व सामान्य लोकांचा खरा मित्र म्हणतात.

वृत्तपत्र हे वस्तुत: जनतेची अभिव्यक्ती आहे. वृत्तपत्र समाजास सशप्त नेतृत्व देत, निराश व थकलेल्या जिवनात उत्साह व विश्वासाचे बळ प्रदान करतो.

भारतीय वृत्तपत्रांचा इतिहास :

भारताच्या इतिहासात पहिले वृत्तपत्र छापण्याची नोंद इ.स.१७७६ मध्ये विल्यम बोलट्सच्या नावावर आहे.

कोलकत्ता येथे जेम्स ऑगस्ट हिक्की याने २९ जानेवारी १७८० रोजी 'बेगॉल गॅझेट' हे पहिले वृत्तपत्र छापुन प्रसिध्द केले.

आठवड्यातुन दोन वेळा प्रकाशित होणारे वृत्तपत्र 'कलकत्ता जर्नल' जेम्स सिलक बकिंधम याने ऑक्टोबर १८१८ मध्ये छापुन आणले.

'भाषिक वृत्तपत्राचे जनक' राजा राममोहन रॉय हे भारतातील भाषांचे अभ्यासक व समाज सुधारक होते. राजकीय व सामाजिक प्रश्नांवरील आपले विचार हे सर्वत्र प्रसारित करण्याकरीता वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे. म्हणून त्यांनी १८२१ साली 'ब्राह्मणिकल मॅगझि

ान' हे इंग्रजी व बंगाली भाषेतील 'संवाद कोमुदी' वृत्तपत्र प्रसिध्द करण्यास सुरुवात केली.

इ.स.१८२२ रोजी मशिबन या व्यक्तिने गुजराती साप्ताहिक 'बॉम्बे समाचार' सुरु केले. ते आज पर्यंत वृत्तपत्र सुरु आहे. हिंदी भाषेतील पहिले वृर्तमान पत्र इ.स.३० मे १८२६ रोजी 'उदन्त मार्तण्ड' या नावाने निघाले. त्याचे संपादक जुगल किशोर शुक्ल हे होते. पण आर्थिक टंचाईमुळे हे वृत्तपत्र ४ सप्टेंबर १८२७ ला बंद पडले.

हिंदी भाषेतील पहिले दैनिक वर्तमान पत्र 'समाचार सुधावर्षण' हे प्रकाशन जुन १८५४ मध्ये झाले त्याचे संपादक श्यामसुंदर सेन होते.

भारतात वेगवेगळ्या प्रदेशातून विभिन्न भाषेतून वृत्तपत्रे छापुन निघु लागली. पण त्यामध्ये काही इंग्रजांच्या ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराकरिता वापरण्यात येऊ लागली. पण त्यावेळच्या समाजवाद्यांनी इंग्रजांना शह देण्यासाठी वृत्तपत्राचा यशस्वी वापर करुन घेतला, स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये वृत्तपत्राचे महत्व हे अनन्य साधारण आहे.

मराठी वृत्तपत्र :

कै.बाळकृष्ण जांभेकर हे मराठी वृत्तपत्र सृष्टीमध्ये आद्य पत्रकार म्हणून मान दिला जातो. ६ जानेवारी १८३२ साली 'दर्पण' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. भारतातील जनतेत ज्ञानाचे प्रसार वहावा ह्या उद्देशाने हे वृत्तपत्र सुरु केले. त्या काळात वृत्तपत्राचा मालक संपादक बातमीदार प्रकाशक, मुद्रक अशी जबाबदारी त्यांच्यावर होती.

दर्पण प्रामुख्याने विधवा विवाह, वर्णभेद या सारख्या पारंपारिक जुन्या रुढी, शिक्षण महत्व या गोष्टींना संपादकांनी महत्त्व दिल्याचे दिसते. त्यानंतर केसरी १८८२ आणि इंदुप्रकाश ह्या सारखी वृत्तपत्रे देशक्तीने प्रेरित णाली.

इ.स.१९२१ मध्ये गांधीजींनी 'सत्याग्रह' हे वृत्तमानपत्र विना परवाना सुरु केले. इंग्रजांनी ते लवकरच बंद केले. त्यानंतर गांधीजीने त्याच वर्षी 'यंग इंडिया' हे इंग्रजी साप्ताहिक सुरु केले. इ.स.फेब्रुवारी १९३३ मध्ये हरिजन हे इंग्रजी साप्ताहिक सुरु केले. ऑगस्ट १९४२ रोजी ते बंद पाडले.

लाला लजपतराय, लो.टिळक, बिविनचंद पाल यंनी स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य असा चार सुत्री कार्यक्रम आणला. भारतीय राजकारण व पत्रकारिती असे दोन गट पडले.

१९८१ साली मराठी भाषेतुन 'केसरी' तर इंग्रजी भाषेतून 'मराठा' वृत्तपत्र निघण्यास झाली. 'केसरी' ह्या वृत्तपत्राने जवळपास पन्नास वर्षे महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर एक क्रांतीकारक विचाराची छाप पाडली. हे वृत्तपत्र सुरु रण्यामागे एक निश्चित विचारसरणी होती.

त्यानंतर आगरकरांनी 'सुधारक' हे वृत्तपत्र १५ ऑक्टोंबर १८८८ रोजी दुसऱ्याच्या मुहूर्तावर काढले. देशातील स्वातंत्र्य चळवळी व त्यातच समाजातील जातीभेद व ब्राम्हणेत्तर चळवळीमुळे समाज जागृत होणे गरजेचे होते. अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, तसेच त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी डॉ.भिमराव आंबेडकरांनी इ.स.१९२० साली 'मुकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले. आर्थिक परिस्थितीमुळे ते बंद झाले. त्यानंतर 'बहिष्कृत भारत' हे ३ एप्रिल १९२७ रोजी पाक्षिक काढले व ते पुढे साप्ताहिक झाले. त्यानंतर 'जनता' पाक्षिक ह्याचे पुढे नामकरण 'प्रबुध्दभारत' असे केले. मराठी वृत्तपत्र सृष्टीच्या इतिहासात प्रारंभी धार्मिक सुधारणांचा काळ, स्वातंत्र्य आंदोलन, राजकिय जागृती, प्रबोधनाचे युग ह्या विविध टप्प्यानंतर स्वातंत्र्योत्तर वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी महत्त्वाचा टप्पा होता. वृत्तपत्रांनी राष्ट्र उभारणीच्या, लोकशाही रुजविण्याच्या कमी प्रमाणेच समर्थ विरोधी पक्ष म्हणून कार्य केले.

मोठ्या मोठ्या शहरात मधून जिल्हा, तालुका पातळीवर आज वृत्तपत्रे निघण्यास सुरुवात झाले आहे. त्यातून विविध ाासन योजना, शासन ध्ेय धोरणे प्रकाशित होत असुन विविध स्तरावरील सुधारणा व माहिती देण्याचे कार्य अविरतपणे वृत्तपत्र करीत आहे.

लोकमत :

लोकमत खाजगी क्षेत्रातील अग्रगन्य व्यासपीठ बहाल करुन विविध प्रकाशन, प्रसारण, मनोरंज, खेळ करणारी डिजीटल मिडीया कंपनी आहे. ३००० हजाराच्या वर कर्मचारी येथे काम करतात.

जागतिक वाचकांच्या बातम्या पोर्टलवरती www.lokmat.com

लोकमत भारतातील सर्वात मोठा वाचले जाणारा प्रादेशिक भाषा वृत्तपत्र आहे, त्यांच्या वाचकांची संख्या २३.८ दश लक्ष एवढी आहे. लोकमतने टी.व्ही. स्पेसमध्ये आपलं अस्तीत्व निर्माण केले आहे. लोकमतच्या पत्रकेत २ जी द ग्लोबर गुजराती नावाने आंतरराष्ट्रीय मासिक आहे. लोकमत ग्रुपने मनोरंजन क्षेत्रामध्ये आपले कार्य केले आहे. त्यामध्ये उत्पादन, चित्रपट आणि दूरध्वनी सामुग्री वितरणातही लोकमत ग्रुप अग्रेसर आहे.

सर्व प्रथम यवतमाळमध्ये वृत्तपत्र प्रकाशन हस्तलिखीत म्हणून सुरुवात केली होते. इ.स.१९७१ मध्ये जवाहरलाल दर्डा यांनी लोकमतचे पहिले प्रकाशन केले. १५ डिसेंबर १९७१ रोजी संपुर्ण दैनिकावृत्ती नागपुर येथून प्रकाशित केली. लोकमत न्युज पेपर प्राव्हेट लिमिटेड या नावाने जवाहरलाल दर्डा यांनी स्थापना केली, तसेच १९८७ मध्ये लोकमत टाईम्स हे वृत्तपत्र इंग्रजीत प्रकाशित करण्यात आले. इ.स.१९९७ साली युवा नेक्सट एक मंच युवकांसाठी तयार करण्यात आला. इ.स. १९८० ते १९९० च्या दशकामध्ये वृत्तपत्राची गुणवत्ता सुधारण्यात आली. इ.स. १९९८ मध्ये मराठी न्युज वेबसाईट www.lokmat.com हे प्रेक्षपण केले. इ.स.१९८९ मध्ये लोकमत चर्चा हिंदी वाचकांसाठी वृत्तपत्र प्रकाशित केले. इ.स.२००० मध्ये सखी मंच ह्या महिलाविषयक पुरवणी प्रकाशित करण्यास सुरुवात केली. इ.स.२००५ मध्ये लोकमत ई-पेपर प्रसारीत करण्यास सुरुवात केली.

सकाळ :

सकाळ वृत्तपत्र हे भारताच्या पुणे शहरातून प्रकाशित होते. हे वृत्तपत्र १ जानेवारी १९३२ साली डॉ.नानासाहेब परुळेकर यांनी पुण्यात सुरु केले होते. २१ सप्टेंबर १९८७ रोजी उद्योजक प्रताप पवार यांनी त्या वृत्तपत्राचा ताबा घेतला. सकाळ हे दैनिक पुणे येथील एक नंबरचे दैनिक असून त्याच्या आवृत्या ह्या पुणे, नाशिक, मुंबई, जळगांव, औरंगाबाद, नागपुर, कोल्हापूर, सोलापूर या ठिकाणापासुन प्रसिध्द होतात.

सकाळची प्रकाशने :

१) सकाळ टाईम्स २) अॅग्रोवन ३) गोमंतक (गोवा) ४) गोमनक टाईम्स (गोवा)

यंग बझ, प्रिमियर, तनिष्क, साप्ताहिक, सकाळ, साम मराठी टि.व्ही. ह्यासारखी प्रकाशित सकाळ समुहाची आहेत.

सकाळच्या आवृत्या :

पुणे, अहमदनगर, धुळे, नाशिक, नंदुरबार, नागपुर, नांदेड, रत्नागिरी, सोलापूर, मुंबई, कोल्हापूर, सांगली, सातारा, वाशिम, अकोला, बेळगांव, जळगांव, रायगड इत्यादी ठिकाणी सकाळ समुहाच्या आवृत्या प्रकाशित होतात.

स्थानिक पातळीवर 'टूडे' नावाची पुरवणी २००६-२००७ या वर्षात सुरु केली. टूडे ही पहिली पुरवणी १४ ऑगस्ट २००६ रोजी प्रकाशित झाली. पुरवणीमुळे स्थानिक पातळीवर बातम्या, जाहिराती घेण्याकरीता नवे व्यासपीठ निर्माण झाले.

राजकीय बातमीचे महत्त्व :

माध्यमामध्ये विविध क्षेत्रात जसे पत्रकार असतात तसे राजकिय क्षेत्रातही पत्रकारांना कार्यक्षम आहे.

दूरचित्रवाणी, आकाशवाणी, वृत्तमान पत्र, राजकिय पत्रकारिती माध्यम म्हणून हे नवीन नावारुपाला येत आहे. वृत्तपत्रांमध्ये राजकिय बातम्यासाठी एक पान राखून ठेवले आहे. तर काही वर्तमानपत्रे आठवड्याला राजकीय पुरवण्या काढतात. राजकिय संबंधीत मासिके, साप्ताहिके, तसेच पाक्षिक ही प्रकाशित होतात.

दूरचित्रवाणी, आकाशवाणी व खाजगी वाहिन्या सुध्द ब्रेकिंग न्युजच्या नावाखाली दिवसभर बुलेटीन देतच असतात. भारतात राजकीय हा विषय जास्तीत जास्त ऐकला व वाचला जातो. त्यामुळे राजकीय बातमीसाठी सर्वच माध्यमांनी पुढाकार घेतलेला दिसत आहे. सध्या राजकिय बातमी क्षेत्राला माध्यमे अधिक महत्व देतांना दिसत आहे. राजकारण हे कुठल्याही देशाची आर्थिक क्षेत्रालाही मजबुत बनवते. कारण देशातील राजकिय धोरण ह्यावरच देशाची एकुण प्रगती अवलंबुन असते.

राष्ट्रीय वर्तमानपत्रे प्रादेशिक वर्तमान पत्रे हे कोणत्या बातम्याचा महत्व देतात आणि

कोणत्या बातम्यांना कमी महत्व देतात. याचा अभ्यास करण्याचा संशोधक प्रयत्न करणार आहे. मी लोकमत व सकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित राजकिय बातम्याचा तौलनिक अभ्यास व संशोधन करण्याचा प्रयत्न करत आहे.

विषय व्याप्ती :

राजकिय पत्रकारिता मुळातच फार पुर्वीपासून रुजु झालेली आहे. स्वातंत्र्य काळात माध्यम ही प्रबोधनात्मक आणि स्वातंत्र्याविषयी गंभीर होती. त्यामुळे मनोरंजनासाठी वर्तमान पत्रे नव्हती. म्हणून राजकिय वार्ताकनाना पुर्वीपासुनच विशेष स्थान आहे. मराठी वृत्तपत्राची निर्मिती ही बहुतांशाने सामाजिक आणि राजकिय जागृतीचे माध्यम याच विचारातून झाली आहे.

विषयाचे महत्त्व :

राजकिय क्षेत्र सध्या खुपच चर्चेचे क्षेत्र बनत झालेले आहे. राजकारण विषयी लोकांचा मानसिकता ही खुपच आकर्षण बनत चालली आहे. भारतात निवडणुकीला एवढे महत्त्व दिले जाते की, त्याविषयी एखादी बातमी जर आली तर मंत्र्याचे दौरे मोठमोठे बजेट भाषण ह्या सारख्या इत्यादी बाबींना दुर्लक्ष करुन त्या बातमीला महत्त्व देताना दिसते.

लोकमत व सकाळ वृत्तपत्रात वाचक वर्गाचा विचार करुन योग्य बदल स्विकारुन राजकीय बातम्या दिल्या जातात. त्यामुळे संशोधनासाठी राजकीय पत्रकारितीबाबत तौलनिक अभ्यासासाठी हा विषय निवडला.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

१. वृत्तपत्र माध्यमातून राजकीय बातम्यांना कितपत प्राधान्य दिले जाते, याचा अभ्यास करणे.

२. लोकमत व सकाळ ही वृत्तपत्रे राजकीय बातम्या प्रसिध्द करतांना सत्ताधारी पक्षाविषयी कोणत्या तऱ्हेची भूमिका घेततात हे समजून घेणे.

३. राजकीय बातम्या प्रसिध्द करतांना राजकारणातील प्रश्नांना महत्त्व दिले जाते की राजकीय व्यक्तीला महत्त्व दिले जाते हे अभ्यासणे.

४. लोकमत व सकाळ राजकीय बातम्या प्रसिध्द करतांना कोणत्या शैलीचा वापर करतात हे समजून घेणे.

५. लोकमत व सकाळमध्ये प्रकाशित राजकीय बातम्यांचा वाचकांची राजकीय मते घडविण्यात असणाऱ्या भुमिकेचे अध्ययन करणे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन दोन्ही वृत्तपत्रातील राजकिय वृत्तांकनासाठीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :

लोकमत व सकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित राजकिय बातम्यांचा तौलनिक अभ्यास ह्या दोन्ही वर्तमान पत्रातील राजकिय बातम्याचाअभ्यासाठी १ वर्षाचा कालावधी संशोधनासाठी निवडला आहे.

सर्वेक्षण :

प्रस्तुत संशोधनासाठी लोकमत व सकाळ वृत्तपत्राच्या एक महिन्यात प्रकाशित अंकातील पहिल्या पानावर प्रकाशित राजकीय बातम्याचे आशय विश्लेषण केले जाईल. तसेच या कालावीत प्रकाशित राजकीय बातम्यांचा वाचकांच्या राजकीय मते घडविण्यातील भूमिका कशी राहिल हे जाणून घेण्यासाठी २०० वाचकांकडून प्रश्नावलीद्वारे तथ्ये संकलित केली जातील. नमुना निवड करतांना यादृच्छीक नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन :

विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनासाठी २०० व्यक्तीकडून प्रश्नावली भरुन घेणे.

दुय्यम स्त्रोत :

माहिती मिळवण्यासाठी पुस्तके, वर्तमान पत्रे, मासिके, लेख याद्वारे माहिती संकलित करणे.

संशोधन आराखडा :

ओीयास पुर्वक विचारपुर्वक, सुक्ष्म दर्शक मांडणी साईज मांडणी इत्यादीची तुलना अधिक सुक्ष्म होण्याच्या दृष्टीने केला जातो. एकाच बातमीचे शब्दांकन करणे पध्दतीने केले आशय एकच पण बातमी लेखन वेगवेगळे कसे आहे ह्याची तुलना करणे. बातमीची रचना कशी आहे याची तुलना करणे.

गृहितकत्ये :

१. वृत्तपत्र माध्यमातुन राजकीय बातम्यांना अधिक प्राधान्य दिले जाते.

२. लोकमत व सकाळ ही दोन्ही वृत्तपत्रे राजकीय बातम्या देतांना सत्ताधारी पक्षावर अधिक टिका करतात.

३. राजकीय बातम्यामध्ये प्रश्नांच्या आाशयापेक्षा व्यक्तीवादाला अधिक महत्व दिले जाते.

४. लोकमत व सकाळ यांची राजकीय बातम्याची शैली संगत असते.

५. लोकमत व सकाळमध्ये प्रकाीत राजकीय बातम्यांचा वाचकांची राजकीय मते घडविण्यात मोठी भूमिका असते.

संशोधनाची संभाव्य प्रकरणे :

१. भारतीय वृत्तपत्रांचा इतिहास.

२. मराठी वृत्तपत्र उदय आणि विकास.

३. संशोधन पद्धती

४. लोकमत व सकाळमधील राजकीय भाषांचे आशय विश्लेषण.

५. लोकमत व सकाळच्या राजकीय बातम्यांचा वाचकांवरील परिणाम.

६. उपसंहार व निष्कर्ष

संदर्भ सूची :

१. गोळवणकर रमा, जनसंवाद सिध्दांत आणि व्यवहार श्री मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.

२. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कान्टीनेटल प्रकाशन, पुणे-३०.

३. आगलावे प्रदिप, २००८, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. करे डॉ.बिभीषण, सामाजिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

५. www.mpscmantra.com

६. www.bookyanga.com

७. www.lokmat.com

८. www.sakal.com

९. www.wiki.com

संशोधक

सतिश प्रकाश वागरे

एम.ए., सेट (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बालाजी शिंदे

वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,

राणीसावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी